**ठळक बातम्या**

- दिवाळीनिमित्त अयोध्येत शरयू तिरावर दीपोत्सव साजरा

- चांद्रयान-२ नं सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या ‘कोरोनल मास इजेक्शन’ चा चंद्रावर पडणारा प्रभाव प्रथमच टिपला असून, हे विज्ञान क्षेत्रातलं ऐतिहासिक यश असल्याची इस्त्रोची माहिती

- मतदार यादीतल्या त्रुटी दूर कराव्यात या मागणीसाठी येत्या १ नोव्हेंबर रोजी मुंबईत विरोधी पक्षांचा मोर्चा

**आणि**

- भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाचा भारतावर ७ गडी राखून विजय

**<><><><><>**

भगवान श्री राम यांच्या आगमनाचा सोहळा साजरा करण्यासाठी उत्तरप्रदेशात शरयू नदीच्या किनाऱ्यावर भव्य दीपोत्सव साजरा होत आहे. राम की पौडी इथल्या ५६ घाटांवर आज २६ लाखांपेक्षा जास्त दिवे प्रज्वलित केले आहेत. या सोहळ्याला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित आहेत. मुख्यमंत्र्यांनी शरयू नदीची आरती केली आणि त्यानंतर दीपप्रज्वलनाने दीपोत्सवाची सुरुवात झाली. यावेळी लेझर शो आणि रामायणावर आधारित नृत्याचा कार्यक्रम सादर झाला. लाखो दिव्यांच्या प्रकाशात अयोध्या नगरीची अध्यात्मिक आणि सांस्कृतिक प्रतिमा जागतिक व्यासपीठावर उजळून निघाली.

**<><><><><>**

दिवाळीनिमित्त महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळीचा सण अंधारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा

आणि नकारात्मकतेवर सकारात्मकतेच्या विजयाचं प्रतीक असल्याचं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नुकत्याच लागू झालेल्या जीएसटी सुधारणांमुळे सणासुदीच्या दिवसांमध्ये खरेदीच्या उत्साहात भर पडली असून, यंदा ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्रमी विक्री होत आहे. धनत्रयोदशीच्या दिवशी काल देशभरात एकूण व्यापार १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाल्याचा अंदाज असून, गेल्या काही वर्षांमधला हा सर्वात उत्साहाचा हंगाम ठरला आहे. यंदा धनत्रयोदशीच्या दिवशी सोन्या-चांदीच्या वस्तूंबरोबर वाहन खरेदीमध्येही तेजी दिसून आली. सोन्याच्या नाण्यांना सर्वाधिक मागणी असून, हॉलमार्क-प्रमाणित हलक्या दागिन्यांनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे.

**<><><><><>**

चांद्रयान-२ नं आपल्या वैज्ञानिक उपकरणांच्या साहाय्यानं सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या ‘कोरोनल मास इजेक्शन’ चा चंद्रावर पडणारा प्रभाव पहिल्यांदाच टिपला असून, हे विज्ञान क्षेत्रातलं ऐतिहासिक यश असल्याचं इस्त्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं म्हटलं आहे.

चांद्रयान-२ नं टिपलेल्या नोंदींमुळे चंद्राचं बाह्य क्षेत्र, चंद्रावरचं विरळ वातावरण आणि त्याच्या पृष्ठभागावर होणारा अवकाशातल्या हवामानाचा प्रभाव समजून घ्यायला सहाय्य होईल, असं बंगळुरू इथल्या इस्त्रोच्या मुख्यालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. २२ जुलै २०१९ रोजी श्रीहरीकोटा इथून प्रक्षेपित करण्यात आलेल्या चांद्रयान-२ नं, २० ऑगस्ट २०१९ रोजी, चंद्राभोवतालच्या लंबवर्तुळाकार कक्षेत यशस्वीपणे प्रवेश केला होता. ७ सप्टेंबर २०१९ रोजी लँडिंगच्या प्रयत्नादरम्यान यानाचा विक्रम लँडरशी संपर्क तुटला होता, तरी ते पूर्णपणे कार्यरत असून ते चंद्राच्या कक्षेत कार्यरत असल्याचं इस्त्रोनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

मतदार यादीतल्या त्रुटी दूर कराव्यात या मागणीसाठी येत्या एक नोव्हेंबर रोजी मुंबईत विरोधी पक्षांचा मोर्चा काढण्यात येणार आहे. खासदार संजय राऊत यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. मतदार यादीतल्या त्रुटीकडे विरोधी पक्ष निवडणूक आयोगाचं सातत्याने लक्ष वेधत आहे. मात्र निवडणूक आयोग विरोधकांच्या मागण्यांची दखल घेत नाही, मतदार यादीत कुठल्याही प्रकारच्या त्रुटी नाहीत असं आयोगाचं म्हणणं आहे, त्यामुळे मोर्चा काढण्याचा निर्णय घेतल्याचं राऊत म्हणाले. मुंबईतल्या मोर्चात राज्यभरातून लोक येतील, या मोर्चात ज्येष्ठ नेते शऱद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राज ठाकरे सहभागी होतील, असं राऊत यांनी सांगितलं.

**<><><><><>**

निवडणुका पारदर्शक, मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात व्हाव्यात, यासाठी केंद्रीय निरीक्षकांनी बिहारमधल्या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर आणि इतर राज्यांच्या ८ विधानसभा मतदारसंघांमधल्या पोटनिवडणुकांवर बारकाईने लक्ष ठेवावं असे निर्देश भारतीय निवडणूक आयोगानं दिले आहेत. बिहारमधल्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यासाठी १२१ सामान्य निरीक्षक आणि १८ पोलिस निरीक्षक, तर दुसऱ्या टप्प्यासाठी १२२ सामान्य आणि २० पोलिस निरीक्षक तैनात केले आहेत. त्याशिवाय, पोटनिवडणुकांसाठी ८ सामान्य आणि ८ पोलीस निरीक्षक देखील तैनात केल्याचं निवडणूक आयोगानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. निरीक्षकांनी राजकीय पक्ष, उमेदवार आणि मतदारांच्या तक्रारींचं निराकरण करण्यासाठी कायम उपलब्ध रहावं. तसंच त्यांनी मतदान केंद्रांना भेट देऊन आयोगानं मतदारांच्या सोयीसाठी हाती घेतलेल्या उपक्रमांची अंमलबजावणी होत आहे, याची खात्री करावी, अशी सूचना आयोगानं दिली आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीतला जागावाटपाचा तिढा तेजस्वी यादव यांनी सोडवावा असं आवाहन काँग्रेसनं केलं आहे. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत शुक्रवारी संपली. मात्र इंडिया आघाडीचं जागावाटपाचं सूत्र जाहीर झालं नाही. त्यामुळे पहिल्या टप्प्यात अनेक मतदारसंघात काँग्रेस, राजद आणि डाव्या पक्षांचे उमेदवार एकमेकांविरोधात लढत आहेत. दुसऱ्या टप्प्यातल्या जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपत आहे. या टप्प्यातल्या कुटुंबा मतदारसंघात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश राम यांच्याविरोधात उमेदवार जाहीर करण्याचा निर्णय राजदनं घेतल्यामुळे संबंध अधिकच ताणले गेले आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षानेही अनेक ठिकाणी काँग्रेसविरोधात उमेदवार उभे केले असून झारखंड मुक्ती मोर्चानं सहा ठिकाणी इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांच्या उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पर्थ इथं झालेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर ७ गडी राखून विजय मिळवला. या विजयासोबतच ऑस्ट्रेलियानं तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

डकवर्थ लुईस नियमानुसार ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २६ षटकांमध्ये १३१ धावांचं लक्ष्य होतं. ऑस्ट्रेलियानं ते ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाचा संघ प्रथम क्षेत्ररक्षणाला उतरला. त्यांच्या गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाज टिकाव धरू शकले नाहीत. नाबाद ४६ धावा करणारा ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श सामनावीर ठरला.

**<><><><>**

आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज इंदौर इथं सुरू असलेल्या सामन्यात इंग्लंडनं भारतासमोर ८ गड्यांच्या मोबदल्यात २८९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. हेदर नाईट आणि ब्रण्ट यांनी केलेल्या ११३ धावांच्या भागीदारीमुळे इंग्लडच्या खेळीला आकार मिळाला. हेदर नाईटनं १०९ धावा केल्या. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २० षटकात २ बाद १०४ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

भारतीय शटलर तन्वी शर्माला आज ज्युनियर वर्ल्ड बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धेत मुलींच्या एकेरीच्या अंतिम फेरीत थायलंडच्या खेळाडू कडून ७-१५, १२-१५ असा पराभव पत्करावा लागला. काल झालेल्या उपांत्य फेरीत तन्वीनं चीनच्या ‘लिऊ सी या’ हिच्यावर १५-११, १५-९ असा सहज विजय मिळवत अंतिम फेरी गाठली होती.

<><><><><>

महायुतीचं सरकार येताच ओबीसी मंत्रालयाची स्थापना केली तसंच ओबीसींच्या प्रगतीसाठी विविध योजना सुरू केल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाज्योती अर्थात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या प्रशासकीय इमारतीचं भूमिपूजन तसंच कोनशीलेचं अनावरण आज नागपुरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. राज्य सरकारनं ओबीसीसाठी सुरू केलेल्या पंजाबराव देशमुख भत्ता योजना, प्रशिक्षणाच्या योजना, स्वयंरोजगाराच्या योजनांचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. सरकारनं आतापर्यंत महाज्योतीला मोठ्या प्रमाणात निधी दिला, तसंच वसतीगृहं सुरू केली, आर्थिक विकास महामंडळं बळकट केली असं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><><>

मुंबईतील गोरेगाव इथं आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मुंबई महानगर प्रदेश मतदार यादी प्रमुख मेळावा झाला. राज्यातल्या मतदार यादीत ९६ लाख बनावट

मतदार असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी यावेळी केला. राज्यात निष्पक्ष निवडणूका होत नाहीत, असा आरोप करत राज ठाकरे यांनी सत्ताधारी पक्षावरही टीका केली.

**//<><><><><>//**